Manoharbhai Shikshan Prasarak Mandal Armori's

**MAHATMA GANDHI ARTS, SCIENCE &**
**LATE NASARUDDINBHAI PANJWANI COMMERCE**
**COLLEGE ARMORI**
**Dist. Gadchiroli (Maharashtra) 441 208**
**Affiliated to Gondwana University, Gadchiroli.**
**Re-accredited by NAAC 'A' with 3.02 CGPA**

---

# SELF STUDY REPORT

## SSR - 2016-17 to 2020-21

---

# CRITERION – V

# STUDENT SUPPORT & PROGRESSION

**METRIC NO: - 5.1.4**

**METRIC NAME: - Average percentage of students benefitted by guidance for competitive examinations and career counselling offered by the Institution during the last five years**




Web:- mgcollegearmori.ac.in
e-mail:- mgcollege.armori@gmail.com
Phone: - 07137-266558



Right Place For Bright Future

Manoharbhai Shikshan Prasarak Mandal's



# Mahatma Gandhi Arts, Science & Late N.P. Commerce College

*NAAC reaccredited 'A' Grade (3.02 CGPA)*

Affiliated to Gondwana University, Gadchiroli

## Employment & Guidance Bureau

## Annual Report

## 2019-2020

# Annual Report

## 2019-20

## Board of Incubation & Linkages

**Director :- Prof. S.B. Gedam**

### Sub-Committee :- Employment & Guidance Bureau

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College has formed various boards for the smooth and effective functioning of academic & administrative process. Board of Incubation & Linkages is one of the important board made for students' employment & guidance related issues. Under this board employment & guidance bureau has been established. The aim of this board is to guide & counsel regular & alumni students for various employment opportunities in the market.

Following various programs/ activities have been organized by this committee under the direction of Prof. S.B.Gedam

- **Workshop on competitive examination**

On 22nd August,2019 Competitive examination committee organized a workshop for guidance on competitive examination to students. Mr. Kalyankumar Dahat , Tahsildar of Armori was invited as a resource person for this workshop. In his guidance he told students about how to decide aim in life, how to do planning , techniques of study & practice , how to be positive, focused, Importance of regularity & determination as well as he taught how to do self SWOC analysis to students to be successful in competitive examination. He shared his experience & struggle to motivate students. All the students were fully satisfied , inspired & happy after attending this programme.

- **Business Skills Development Programme**

The mission of our college is to contribute in economical & industrial development of the local area. Therefore committee has taken an initiative to develop Business skills in students & started a noble activity of "Business Skill Development Programme" to encourage students for self-employment. Under this activity students sell goods in college campus during annual function of the college under the guidance of teachers. The aim of this activity is to give hands on experience about the business to the students. This year Business Skills Development Programme was organized on 24th Janeuary,2020 after inauguration of annual function of the college. Total 70 Students of various departments participated in this activity in which 21 stalls opened by different groups of students. Students were found motivated & happy after this

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College Armori

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

activity to become a businessman / an entrepreneur in future which is the real outcome of this programme.

- **Career Opportunities in Commerce & Management**

On 11th February, 2020 committee organized a Special programme on "Career Opportunities in Commerce & Management" for students of commerce department. Dr. Surya, Dean of Commerce & Management of Gondwana University,Gadchiroli was invited as a chief guest & resource person for this programme. He shared some statistics regarding job opportunities in Indian & International labour market for commerce & management students in todays era. In his guidance he told many career opportunities to students to get jobs in private & public sectors as well as to become a successful entrepreneur. He also told about the importance of management of personal life, professional life , social life & financial management as well. In question & answer session he guided students about some key skills i:e observation skills, problem solving skill, know yourself, presentation skills, personality development etc. to become successful in career. All the benefited students were fully satisfied, happy & motivated after attending this programme.

- **Women Entreneurship Programme**

Women empowerment committee of the college organized a programme under the title "Women Entreneurship" on 5th March ,2020 during celebration of "International Women Week". Dr. R.V Ghonmode Vice principal of the college precided the chair & Dr. M.M.Thaore head of commerce department was invited as guest for this programme. Dr. M.M. Thaore guided girls students about how to be an entrepreneur, how to start business & Various skills required to be a successful entrepreneur. Dr.R.V.Ghonmode shared his knowledge & experience with students & told the importance of self employment to motivate students in his speech.

- **5 Days Webinar Series during lockdown period**

During lockdown period Gondwana University, Gadchiroli organized a webinar series of 5 days i:e from 09/04/2020 to 13/04/2020 on Zoom app under the title "Combating Corona Lock-down With Skill Enhancement Program" in which college took initiative to motivate maximum number of students for the participation in this webinar series. All the faculties trained & guided to students for the installation & use of Zoom app.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

- In this webinar series  following topics had been covered.

| Date | Topic | Resource Person |
|---|---|---|
| 09/04/2020 | Unreeling Entrepreneurship | Mr. Manish Upadhyay |
| 10/04/2020 | Effective role of employees in e-commerce companies. | Manju Gupta |
| 11/04/2020 | Design Your Dreams | Nisha Chandak |
| 12/04/2020 | Flight To Success | Manjusha Bhaskarwar |
| 13/04/2020 | Employment Opportunities After Covid-19 | Sajan Shah |

Students from all the faculties have participated & successfully completed this webinar series.

Date:-10/05/2020

Dr. M. M. Thaore

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

दैनीक लोकशाही वार्ता दि. 25/8/2019

# स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम म्हणजे शालेय ज्ञानाची पुनरावृत्ती

## तहसीलदार कल्याणकुमार डहाट यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी/ आरमोरी

स्पर्धा परीक्षा ही फार कठीण व अशक्य अशी परीक्षा नसून सुत्रबध्द व निश्चित ध्येय ठेवून वेळ आणि अभ्यासाचे नियोजन केल्यास कोणताही विद्यार्थी परीक्षेत यशस्वी होऊ शकतो. ग्रामीण असल्याचा संकोच न बाळगता ग्रामीण विद्यार्थीच स्पर्धा परीक्षेत जास्त प्रमाणात यशस्वी होत आहेत. दैनंदिन घडल, घडामोडी विषयी विद्यार्थ्यांचे निश्चित मत असले पाहिजे. तसेच स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम म्हणून शालेय ज्ञानाची पुनरावृत्ती असते, असे प्रतिपादन तहसीलदार कल्याणकुमार डहाट यांनी केले.

स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा होते. प्रमुख अतिथी म्हणून पोलिस उपनिरीक्षक चंदनसिंग चव्हाण, लिंकेजेस ॲन्ड इन्कुबेशनचे संचालक प्रा. शशिकांत गेडाम, सेलटॅक्स ऑफीसर परीक्षा उत्तीर्ण महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी रुपेश भोयर, स्पर्धा परीक्षा प्रमुख डॉ. विजय गोरडे उपस्थित होते.

मीसुध्दा शालेय व महाविद्यालयीन शिक्षण जीवनात सामान्य विद्यार्थी होतो. त्यामुळे स्पर्धा परीक्षा यशस्वीतेसाठी फार हुशार असण्याची गरज नाही, असे आपणास वाटते. सातत्यपूर्ण अभ्यास, धीर आणि संयमशील वृत्ती विद्यार्थ्यांना अधिकारी बनवू शकते, असे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक चंदनसिंग चव्हाण यांनी यावेळी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रुपेशकुमार भोयरचे स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेसंबंधी प्रश्न विचारून स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी संकल्प केला. प्रास्ताविक प्रा. शशिकांत गेडाम यांनी केले, संचालन प्रा. डॉ. विजय रैयतकर यांनी तर आभार प्रा. विजय गोरडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. रमेश ढोंबरे, प्रा. डॉ. राजेंद्र घोनमोडे, प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, प्रा. गजानन बोरकर, प्रा. डॉ. उत्तमचंद कांबळे, प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रा. सीमा नागदेवे, प्रा. डॉ. छगन मुंगमोडे, प्रा. गंगाधर जुआरे, प्रा. डॉ. राजेंद्र कदम, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रशांत दडमल, महाविद्यालयाच्या सर्व विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.




**Workshop on competitive examination**



**Students Participation in Business Skills Development Programme**

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College
Armori

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Dist. Gadchiroli



कार्यशाळा

उपप्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे यांचे प्रतिपादन

# महिलांनी स्वावलंबी होणे महत्वाचे

महिलांनी उद्योजक बनावे - डॉ. मनोज ठवरे

**Programme on "Women Entreneurship"**










**Participation of Students in 5 Days Webinar Series on ZOOM App**

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. नसरुद्दीनभाई पंजवानी

वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

# रोजगार मार्गदर्शन केन्द्र व प्लेसमेंट सेल

# वार्षिक अहवाल

सत्र २०१७–२०१८

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

प्रस्तावना :—

स्पर्धा परीक्षेत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पण बऱ्याचशा विद्यार्थ्यांची याबाबतची मानसिकता विचार करायला लावणारी आहे. काम करायचे? पण कसे करायचे? एम.पी.एस.सी. ची तयारी करावी किंवा फक्त पैसा मिळविण्याच्या आकर्षणाने व्यवसायाकडे वळायचे, अभ्यास कसा करायचा, कोणत्या क्षेत्राची निवड करायची असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनात गोंधळ निर्माण करीत असतात.

हाच उद्देश लक्षात घेऊन आमच्या महाविद्यालयात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केन्द्र स्थापन करण्यात आलेले आहे. या मार्गदर्शन केन्द्राच्या वतीने वर्षभर एम.पी.एस.सी, यू.पी.एस.सी., बॅंकिंग, रेल्वे, नेट, सेट इत्यादी स्पर्धापरीक्षांविषयी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे तसेच या परीक्षांचे प्रश्नपत्रिकांचे स्वरूप माहिति करून घेण्याकरितास्पर्धापरीक्षांचे आयोजन करणे इत्यादी कार्यक्रम या विभागाच्या वतीने राबविण्यात येतात.

- रोजगार मार्गदर्शन केंद्र व प्लेसमेंट सेल :—

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली गठित करण्यात आलेली 'रोजगार मार्गदर्शन केंद्र व प्लेसमेंट सेल'सत्र २०१७—१८करिताची समिती पुढीलप्रमाणे.

१. प्रा. शशिकांत गेडाम — समन्वयक

२. प्रा. डॉ. उत्तमचंद कांबळे — सदस्य

३. प्रा. पराग मेश्राम — सदस्य

४. प्रा. डॉ. विजय गोरडे — सदस्य

५. प्रा. मनोज ठवरे — सदस्य

६. प्रा. प्रियदर्शन गणवीर — सदस्य

समितीने सत्र २०१७—१८ करिता कार्यभार स्वीकारून प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५/०७/२०१७ ला सभा घेण्यात आली. यात वार्षिक नियोजन करून महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेण्याचे ठरले.

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

## विभागाच्या वतीने आयोजित विविध उपक्रम

- रोजगार मार्गदर्शन कार्यशाळा :—

दि.११/०७/२०१७ ला महात्मा गांधी महाविद्यालयाच्या रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व दैनिक पुण्यनगरी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या रोजगार मार्गदर्शन शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे होते तर अतिथी म्हणून दैनिक पुण्यनगरीचे वितरण व्यवस्थापक श्री. ईरशाद शेख, जिल्हा प्रतिनिधी श्री. प्रल्हाद म्हशाखेत्री, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा.

शशिकांत गेडाम उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टिकोनातून मौलीक मार्गदर्शन केले तसेच पुण्यनगरीच्या वतीने उपस्थित मान्यवरांनी पुण्यनगरीद्वारे प्रकाशित विविध पुरवण्या याची माहिती देऊन विद्यार्थ्यांना वाचनाबरोबर लिहिते होण्याचे आवाहन केले.

आजचे युग स्पर्धेचे युग आहे. स्पर्धा परीक्षेत उतरताना आधी स्वत:चे ध्येय ठरविणे आवश्यक असून ध्येय निश्चित केल्याशिवाय रोजगाराच्या संधी प्राप्त करता येणे अशक्य आहे. मनात जिद्द आणि चिकाटी बाळगून स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करता येते, असे प्रतिपादन आरमोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक श्री. महेश पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी वेळेचे व्यवस्थापन, अभ्यासाचे नियोजन, ग्रुप डिस्कशन, व्यवस्थापन, मनाची इच्छा अशा स्पर्धा परीक्षेतील यशस्वीतेच्या विविध पायऱ्या स्पष्ट केल्या व जिद्दीने आणि चिकाटीने स्पर्धा परीक्षेत उतरण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. शशिकांत गेडाम यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. उत्तमचंद कांबळे, प्रा. डॉ. मनोज ठवरे, श्री. केशव हुकरे, तालुका प्रतिनिधी श्री. आकाश चिलबुले आदींनी परिश्रम घेतले.

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा :—

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथील रोजगार मार्गदर्शन केंद्र व प्लेसमेंट सेल विभाग, लोकमत समुह व झेप करिअर अकॅडमी गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'घडवा तुमचे युनिक भविष्य' च्या वाचकार्पण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा दि. १२/०९/२०१७ ला आयोजित करण्यात आली. याप्रसंगी स्पर्धा परीक्षा कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रमुख मार्गदर्शक उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, पोलीस उपनिरीक्षक शितल राणे, लोकमत प्रतिनिधी श्री. प्रदीप बोडणे, लोकमतचे तालुका प्रतिनिधी श्री. विलास चिलबुले, श्री. महेंद्र रामटेके, झेप करिअर अकॅडमीचे नताशा मेश्राम आदी उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख मार्गदर्शक उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे यांनी आजचे विद्यार्थी उद्याच्या उज्वल भारताचे भविष्य आहेत. प्रत्येकामध्ये सुप्त गुण दडलेले असतात. ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण परिश्रम आणि मेहनत घेतल्याशिवाय स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करता येत नाही. स्पर्धा परीक्षेत केवळ उपजिविकेचा मार्ग म्हणून न उतरता समाजपरिवर्तनाच्या अपेक्षेने आणि मौलिक योगदान देण्याच्या उदंड इच्छेने उतरले पाहिजे असे स्पष्ट करून दुर्दम्य इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेत यश शक्य असल्याचे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, अभ्यासाचे नियोजन कसे करावे, स्पर्धा परीक्षेतील यशाचे सुत्र याविषयी सखोल चिंतन व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निरसन केले.

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI, Dist. Gadchiroli

यावेळी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी विद्यार्थ्यांनी पदवीचे शिक्षण घेताना पाठ्यक्रमिक अभ्यासासोबतच स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिने तयार असण्याची गरज सांगितले. स्पर्धा परीक्षा कार्यशाळेच्या माध्यमातुन विद्यार्थी स्पर्धा परीक्षेविषयक नियोजित मानसिकता जोपासतील असा आशावाद व्यक्त केला तसेच लोकमत समुहाने स्पर्धा परीक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्यासंदर्भात सुरू केलेल्या सदराचे कौतुक करून विद्यार्थ्यांनी या सदराचा लाभ घेण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्यांनी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे उपयोगी सुत्र स्पष्ट केले. पोलीस उपनिरीक्षक शितल राणे यांनी परिस्थितीचा बागुलबुवा न करता परिस्थितीवर मात करून स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करण्याची मानसिकता जोपासून परिश्रम करावे असे स्पष्ट केले. श्रीमती नताशा मेश्राम यांनी गडचिरोली जिल्ह्यातील झेप करिअर अकॅडमी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले. यावेळी उपस्थितांची समायोचित भाषणे झाली.

या कार्यशाळेत उपस्थितांनी लोकमतने सुरू केलेल्या स्पर्धेच्या जगात या सदराचे विमोचन केले. झेप करिअर अकॅडमी तर्फे ९० गुणांची विद्यार्थ्यांची टेस्ट घेण्यात आली. स्पर्धा परीक्षेशी संबंधित प्रश्नांचा त्यात अंतर्भाव होता. ४०० च्या वर विद्यार्थ्यांनी या परीक्षेत तसेच आयाजित कार्यशाळेत सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. प्रदीप बोडणे यांनी केले तर संचालन डॉ. विजय गोरडे यांनी केले. आभार प्रा. शशिकांत गेडाम यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, प्रा. नोमेश मेश्राम, प्रा. पराग मेश्राम, डॉ. उत्तमचंद कांबळे, डॉ. राजेंद्र चव्हाण, प्रा. छगन मुंगमोडे, प्रा. प्रियदर्शन गणवीर, डॉ. विजय रैवतकर, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रा. गजानन बोरकर, प्रा. गजेंद्र कढव, श्री. सुशील वाटेकर, श्री. राकेश पारधी यांनी परिश्रम घेतले.

- मुलाखत तंत्र कार्यशाळा :—

दि. १९/१२/१७ ला मुलाखत तंत्र या विषयावर प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे समन्वयक प्रा. शशीकांत गेडाम होते. कार्यशाळेत प्रा. प्रियदर्शन गणविर यांनी नोकरी मिळविण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला मुलाखंत तंत्राचा ज्ञान असणे आवश्यक असून मुलखत देतांना कोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहीजे तसेच मुलाखतीत यशस्वी होण्याच्या विवीध कृत्या विविध उदाहरण देऊन स्पष्ट केल्या.

अध्यक्षीय मार्गदर्शन प्रा. शशीकांत गेडाम यांनी प्लेसमेंट विभागाच्या वतीने आयोजित विविध उपक्रमाची माहीती देवून महाविद्यालयाचे प्लेसमेंट विभाग शैक्षणीक उपक्रम व्यतिरिक्त नोकरी मिळवून देण्याच्या प्रयत्नरत असण्याचे सांगीतले कार्यशाळेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागाच्या बहुसंख्य

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College ★ Armori ★

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI, Distt. Gadchiroli

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राजेंद्र घोनमोडे, प्रा. मोहन रामटेके, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. गजेंद्र कढव, प्रा. इशाक खान, प्रा. गंगाधर जूआरे, प्रा. डॉ. जयेश पापडकर, प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रा. डॉ. विजय गोरडे, प्रा. डॉ. मनोज ठवरे, प्रा. पराग मेश्राम यांचे सहकार्य लाभले.

- प्लेसमेंट शिबिर (एक्सीस बँक):—

दि. २१/१२/२०१७ ला रोजगार मार्गदर्शन केंद्र व प्लेसमेंट सेल विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम, प्रमुख मार्गदर्शक म्हणून एक्सीस बँक गडचिरोलीचे मुख्य व्यवस्थापक श्री. प्रकाश ठाकरे, सहाय्यक व्यवस्थापक श्री. विशाल कावळे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. प्रकाश ठाकरे यांनी युवकांना एक्सीस बँकेतील नोकरीतील संधी याबाबत मार्गदर्शन करून मुलाखतीबद्दल माहिती दिली. प्रा. शशिकांत गेडाम यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील नोकरीच्या संधींची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयीन १२८ विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट शिबिरात भाग घेऊन एक्सीस बँकेद्वारे घेण्यात आलेल्या मुलाखती दिल्या व ०२ विद्यार्थ्यांच निवड करण्यात आली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. डॉ. विजय गोरडे, प्रा. डॉ. मनोज ठवरे, प्रा. पराग मेश्राम, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, प्रा. मोहनलाल रामटेके, प्रा. गंगाधर जुआरे, प्रा. डॉ. जयेश पापडकर, प्रा. गजेंद्र कढव, प्रा. गजानन बोरकर, प्रा. स्वाती हुलके, प्रा. तृप्ती गिरडकर, रमेश इन्कने, शिलाबाई घोडीचोरे, प्रशांत दडमल यांनी परिश्रम घेतले.

- दोन दिवसीय रोजगार मेळावा :

जिल्हा कौशल्य विकास आणि रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० ते २१ डिसेंबर २०१७ ला महाविद्यालयाच्या सभागृहात रोजगार शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरात महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम यांनी रोजगार शिबिराची भूमिका व संकल्पना स्पष्ट केली. यावेळी एस.आय.एस. रिजनल ट्रेनिंग सेंटर गोवा येथील अधिकारी श्री. जगन्नाथ खरात, कॅप्सटान फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रायवेट लिमिटेड हैद्रबादचे श्री. ज्ञानेश्वर बिट्टूरवार, जिल्हा कौशल्य विकास आणि रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे संचालक श्री. माधव शेंडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरक मार्गदर्शन केले. शिबिरात महाविद्यालयाच्या विविध शाखांतील ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मेळाव्यात १७ युवकांना एस.आय.एस. रिजनल ट्रेनिंग सेंटर गोवा यांनी नोकरीची संधी दिली. तर कॅप्सटान फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रायवेट लिमिटेड हैद्रबाद यांनी २१ युवकांची निवड केली.

M. G. Arts, Science & Late N. P. Commerce College ARMORI Distt. Gadchiroli

शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. डॉ. मनोज ठवरे, प्रा. पराग मेश्राम, प्रा. डॉ. विजय गोरडे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रशांत दडमल, किशोर कुथे यांनी विशेष सहकार्य केले.

- **रोजगार मेळावा गडचिरोली येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग:**

पोलीस विभाग गडचिरोली यांच्या वतीने दि. ०५/०१/२०१८ ला गडचिरोली येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी ५१ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले.

- **विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने व संधी या विषयावर मार्गदर्शन शिबिर:**

दि. ०१/०३/२०१८ ला 'विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने व संधी' या विषयावर मार्गदर्शन शिबिर महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथील रोजगार व स्वयंरोजगार केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, गांधीनगर गुजरात येथील टाटा कन्सल्टींगचे सिनियर इंजिनिअर श्री. विक्रम वंजारी, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, संयोजक डॉ. राजेंद्र चव्हाण, डॉ. विशाखा वंजारी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी गांधीनगर गुजरात येथील टाटा कन्सल्टींगचे सिनियर इंजिनिअर श्री. विक्रम वंजारी यांनी प्रत्येकामध्ये सुप्त गुण दडलेले असतात. ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण परिश्रम आणि मेहनत घेतल्याशिवाय कोणत्याही परीक्षेत यश प्राप्त करता येत नाही. ग्रामीण आणि शहरी अशी मानसिकता न जोपासता प्रत्येक क्षेत्राशी व परिसराशी एकरूप होऊन उद्‌भवणाऱ्या परिस्थितीवर मात करता आले पाहिजे. मेहनत, परिश्रम, स्थिरता, नियोजन, आत्मविश्वास आदी घटक ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक असतात. सध्या स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत दुर्दम्य इच्छाशक्ती आणि परिश्रमाने यश प्राप्त करता येणे शक्य असल्याचे स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, जीवनात विविध अडचणींवर मात करून यश कसे संपादन करता येते तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या सोबतीने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने आपली यशाची वाटचाल कशी करावी याविषयी उद्‌बोधन केले तसेच त्यांनी मुलाखत व मुलाखतीचे तंत्र परिक्षेची तयारी यावरही मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांचे सकारात्मक उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले.

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थी जीवनात विविध परीक्षेत यश संपादन करण्याची नियोजित मानसिकता जोपासतील असा आशावाद व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांनी विविध आव्हानांचा सकारात्मकतेने सामना करून व योग्य नियोजनाने आयुष्यात यशस्वी व्हावे, असे स्पष्ट केले. ग्रामीण भागातूनही आपणास पुढे येता येते हे सांगताना ग्रामीण, शहरी असा न्युनगंड न बाळगता यशाच्या दिशेने सकारात्मकता जोपासावी असे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उद्‌बोधित केले.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

प्रास्ताविक डॉ. शशिकांत गेडाम यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकातून शिबिराच्या आयोजनाची भूमिका विशद केली. संचालन प्रा. कविता खोब्रागडे यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र चव्हाण यांनी मानले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. शिबिरात विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

- रोजगार मेळावा :

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील रोजगार व स्वयंरोजगार विभाग व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात दि. १५/०३/२०१८ ला रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम अध्यक्षस्थानी होते. उद्घाटक म्हणून जिल्हा कौशल्य विकास अधिकारी श्री. योगेंद्र शेंडे उपस्थित होते. याप्रसंगी योगेंद्र शेंडे यांनी रोजगाराच्या विविध संधी कशा प्राप्त करता येऊ शकतात याविषयी मार्गदर्शन केले. बेरोजगार तरुणांना उद्योजकतेच्या दृष्टीने संधी मिळवून देण्यासाठी विविध कंपन्यांना आमंत्रित करून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विभाग कटिबध्द असल्याचे स्पष्ट केले.

उद्घाटनानंतर विविध कंपन्यांतील पदाधिकाऱ्यांनी रोजगारविषयक माहिती दिली. त्यात प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे श्री. अनिल दुधपचारे, श्री. गणेश भूते, कॅप्स्टॉनचे श्री. ज्ञानेश्वर बिट्टेवार व नवभारत फर्टीलायझर नागपूर येथील श्री. मनोज रहांगडाले यांचा समावेश होता. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. तसेच उपलब्ध संधीची माहिती दिली व रोजगारविषयक मार्गदर्शन केले. 19

याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतातून प्रा. शशिकांत गेडाम यांनी केवळ शासकीय नोकरीवर अवलंबून न राहता आपल्या कौशल्याच्या आधारे रोजगार प्राप्त करावे असे उपस्थित विद्यार्थ्यांना आवाहन केले. रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोज ठवरे यांनी केले. त्यांनी आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. संचालन प्रा. पराग मेश्राम यांनी केले तर आभार डॉ. विजय गोरडे यांनी मानले.

प्रा. शशिकांत गेडाम
विभागप्रमुख
रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केन्द्र

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Dist. Gadchiroli

xerox




दि .११/७/ १७ च्या रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करतांना श्री.इरशाद शेख




रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करतांना पोलीस निरीक्षकश्री.महेश पाटील व उपस्थित विद्यार्थी

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARM...




१२/९/१७ च्या स्पर्धा परीक्षा कार्यशाळे ला मार्गदर्शन करतांना

उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ .सागर कवडे



स्पर्धा परीक्षा कार्यशाळे ला उपस्थित विद्यार्थी व प्रश्न विचारतांना विद्यार्थी

M. G. Arts, Science & Late N.P. Commerce College

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli




दि .१९/१२/१७ च्या मुलाखत तंत्र कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना प्रा. प्रियदर्शन गणवीर



दि .१९/१२/१७ च्या मुलाखत तंत्र कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

xerox

48




दि . २१/१२/ १७ च्या अक्सीस बँकेच्या प्लेसमेंट कॅम्प मध्ये मुलाखत घेतांना बँकेचे व्यवस्थापक श्री.प्रकाश ठाकरे व प्रा. शशिकांत गेडाम



दि . २१/१२/ १७ च्या अक्सीस बँकेच्या प्लेसमेंट कॅम्प मध्ये मुलाखत घेतांना बँकेचे व्यवस्थापक श्री.प्रकाश ठाकरे व प्रा. शशिकांत गेडाम

M.G. Arts, Science & Late N.P Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli




दि. २० ते२१डिसेंबर२०१७ च्या प्लेसमेंट कॅम्प शारीरिक मोजमाप करतांना  कंपनीचे अधिकारी




दि. २० ते२१डिसेंबर२०१७ च्या प्लेसमेंट कॅम्प शारीरिक मोजमाप करतांना  कंपनीचे अधिकारी

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College Armori

M. G. Arts, Science & Late N. P. Commerce College ARMORI Distt. Gadchiroli

ARMORI Distt. Gadchiroli

Xerox
62




दि.१/३/१८ ला आयोजित विद्यार्थासामोरील आव्हाने व संधी या विषयावरील मार्गदर्शन शिबिरात मार्गदर्शन करतांना टाटा कान्साल्तान्सी गांधीनगर ,गुजरात चे सिनिअर इंगीनीअर श्री. विक्रम वान्जारीव मंचावर उपस्थित प्रा डॉ लालासिंग खालसा व इतर मान्यवर



दि.१/३/१८ ला आयोजित विद्यार्थासामोरील आव्हाने व संधी या विषयावरील मार्गदर्शन शिबिरात सहभागी विध्यार्थी

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College




दि १५/३/१८ ला अयोजीत रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना जिल्हा रोजगार अधिकारी श्री. योगेंद्र शेंडे



दि १५/३/१८ ला अयोजीत रोजगार मेळाव्यात सहभागी युवक

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

पुण्य नगरी

11-7-17

आरमोरी येथे रोजगार स्वयंरोजगार कार्यशाळा | महेश पाटील यांचे प्रतिपादन

# यशस्वी जीवनांसाठी जिद्द व चिकाटी गरजेची



आरमोरी : यशस्वी जीवन जगण्यासाठी सर्वच प्रयत्न करतात. प्रसंगी अपयश आले तो जिद्द व चिकाटी सोडून निराशा पत्करून जीवनाचा मार्ग बदलवितात. मात्र, एकच उद्देश घेऊन भविष्यात यशस्वी होण्यासाठी निश्चित केलेल्या उद्देशपर्यंत पोहचण्यासाठी जिद्द व चिकाटीची कास धरणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आरमोरीचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी व्यक्त केले.

येथील महात्मा गांधी महाविद्यालयाच्या रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व दै. पुण्य नगरी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश सोयरे होते तर प्रमुख अतिथी म्हणून दै. पुण्य नगरीचे वितरण व्यवस्थापक इरशाद शेख, जिल्हा प्रतिनिधी (ग्रामीण) प्रल्हाद म्हशाखेत्री, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना पोलीस निरीक्षक पाटील म्हणाले, दै. 'पुण्य नगरी' वृत्तपत्र समूहाने सुरू केलेल्या 'सात वार, सात पुरवण्या' या सर्वसामान्यांच्या जीवनांना जीवन जगण्याचा मार्ग दाखविणाऱ्या असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या आहे. आधुनिक काळात यशस्वी जीवन जगण्यासाठी वृत्तपत्रांचे मोठे योगदान आहे. आज 'पुण्य नगरी' वृत्तपत्राने सर्वच स्तरातील नागरिकांना उपयुक्त ठरणाऱ्या पुरवण्या देऊन वाचकांसाठी मोठी मेजवानी उपलब्ध करून दिली आहे. या पुरवण्याचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. शशिकांत गेडाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनात प्रा. डॉ. उत्तमचंद कांबळे, प्रा. मनोज ठवरे, केशव हुकरे, तालुका प्रतिनिधी आकाश चिलबुले आदींनी सहकार्य केले.

दैनिक भास्कर - 15/09/17

# प्रबल इच्छाशक्ति से सफलता संभव




## उपविभागीय पुलिस अधीक्षक डा. कवडे का कथन

## महात्मा गांधी महाविद्यालय में स्पर्धा परीक्षा कार्यशाला

संवाददाता। आरमोरी. आज के छात्र कल का भविष्य हैं। सभी में सुप्त गुण छिपे होते हैं। लक्ष्य निर्धारित कर निरंतर परिश्रम व मेहनत के बिना स्पर्धा परीक्षा में सफलता प्राप्त नहीं की जा सकती। प्रबल इच्छाशक्ति व आत्मविश्वास से ही स्पर्धा परीक्षा में सफलता संभव है। यह विचार गढ़चिरोली के उपविभागीय पुलिस अधिकारी डा. सागर कवडे ने किया। स्थानीय महात्मा गांधी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय में ड्रेप करिअर अकादमी के तत्वावधान स्पर्धा परीक्षा कार्यशाला का आयोजन किया गया था। इस अवसर पर वह बतौर प्रमुख वक्ता बोल रहे थे। कार्यक्रम की अध्यक्षता महाविद्यालय के प्राचार्य डा. लालसिंह खालसा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र के समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, पुलिस उपनिरीक्षक शीतल राणे, विलास चिलबुले, महेंद्र रामटेके, प्रदीप बोडणे, ड्रेप करिअर अकादमी की नताशा मेश्राम प्रमुखता से उपस्थित थे।

इस अवसर पर प्राचार्य डा. लालसिंह खालसा ने स्पर्धा परीक्षा में सफल होने के उपयोगी सूत्र स्पष्ट किए। पुलिस उपनिरीक्षक शीतल राणे ने मार्गदर्शन करते हुए कहा कि परिस्थिति से निराश न होकर विपरित परिस्थिति पर मात कर स्पर्धा परीक्षा में सफलता प्राप्त करने की मानसिकता का जतन कर कड़ा परिश्रम करना नितांत आवश्यक है।

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

M. G. Arts, Science & Late N. P. Commerce College * Armori *

लोकमत
2-3-18

# दुर्दम्य इच्छाशक्तीने यश शक्य

## विक्रम वंजारी यांचे प्रतिपादन : आरमोरीत मार्गदर्शन शिबिर



मार्गदर्शन करताना अभियंता विक्रम वंजारी मंचावर डॉ. लालसिंग खालसा.

लोकमत न्यूज नेटवर्क

आरमोरी : प्रत्येकामध्ये सुप्त गुण असतात. ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण परिश्रम घेतल्याशिवाय कोणत्याही परीक्षेत यश प्राप्त करता येते. मेहनत, स्थिरता, नियोजन, आत्मविश्वास आदी ध्येय प्राप्तीसाठी आवश्यक असतात. स्पर्धेत दुर्दम्य इच्छाशक्ती आणि परिश्रमाने यश प्राप्त करता येते, असे प्रतिपादन गुजरातच्या गांधीनगर येथील टाटा कन्सल्टिंगचे वरिष्ठ अभियंता विक्रम वंजारी यांनी केले.

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात रोजगार व स्वयंरोजगार केंद्राच्या वतीने आयोजित विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने व संधी या विषयावर ते मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा होते. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, प्रा. शशिकांत गेडाम, डॉ. रमेश ठोंबरे, डॉ. राजेंद्र चव्हाण, डॉ. विशाखा वंजारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने व संधी या विषयावर वंजारी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी परीक्षेत यश संपादन करण्यासाठी नियोजित मानसिकता जोपासावी, असा आशावाद व्यक्त करीत विद्यार्थ्यांनी सकारात्मकता बाळगावी, असे आवाहन केले. संचालन प्रा. कविता खोब्रागडे यांनी केले.

दैनिक भास्कर
20-12-17

# विद्यार्थियों को साक्षात्कार में सफल होने के दिए टिप्स




संवाददाता | आरमोरी.

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालय के प्लेसमेंट विभाग की ओर से प्राचार्य लाल सिंह खालसा के मार्गदर्शन में 19 दिसंबर को साक्षात्कार तकनीक पर एक दिवसीय कार्यशाला का आयोजन किया गया। जिसकी अध्यक्षता प्लेसमेंट विभाग के समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम ने की। इस अवसर पर प्रा. प्रियदर्शन गणवीर ने नौकरी पाने के लिए अत्यंत जरूर साक्षात्कार तकनीक में पास होने के विद्यार्थियों को टिप्स दिए। प्रा. शशिकांत गेडाम ने प्लेसमेंट विभाग की ओर से चलाए जानेवाले विभिन्न उपक्रमों की जानकारी देकर महाविद्यालय के प्लेसमेंट विभाग शैक्षणिक उपक्रम के अलावा नौकरी दिलाने का प्रयास होने की बात कही। आयोजन की सफलता के लिए, प्रा.डा. घोनमोडे, प्रा. रामटेके, प्रा. घोनमोडे, प्रा. कठव, प्रा. इशाक खान, प्रा. जुआरे, प्रा. डा. पापड़कर, प्रा. डा. डोर्लीकर, प्रा.डा. विजय गोरडे, प्रा.डा. ठवरे, प्रा. मेश्राम आदि ने प्रयास किया।

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College ★ Armori ★

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

पुण्यनगरी

23-12-17

# महात्मा गांधी महाविद्यालयात रोजगार शिबिर



आरमोरी : महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने २० व २१ डिसेंबर रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात रोजगार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम, गोवा येथील अधिकारी जगन्नाथ खरात, ज्ञानेश्वर बिट्टूरवार, माधव शेंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिरात महाविद्यालयाच्या विविध शाखांतील ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यशस्वीतेसाठी प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा.डॉ. मनोज ठवरे, प्रा. पराग मेश्राम, प्रा.डॉ. विजय गोरडे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रशांत दडमल, किशोर कुथे यांनी सहकार्य केले.

देशोन्नती

30-12-17



महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

**महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी :** महाविद्यालय व जिल्हा कौशल्य विकास आणी रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र गडचिरोलीच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय प्लेसमेंट शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.शशिकांत गेडाम यांनी रोजगार शिबिराची भूमिका व संकल्पना स्पष्ट केली. शिबिराला मार्गदर्शक म्हणून गोवा व हैद्राबाद येथील अधिकारी, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन केंद्राचे संचालक माधव शेंडे उपस्थित होते. शिबिरात ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College ★ Armori ★

PRINCIPAL
M. G. Arts, Science &
Late N. P. Commerce College
ARMORI Distt. Gadchiroli

सकाळ
गडचिरोली, सोमवार
१९ मार्च २०१८
४

# महात्मा गांधी महाविद्यालयात रोजगार मेळावा

आरमोरी, ता. १८ : येथील महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात रोजगार व स्वयंरोजगार विभाग तसेच जिल्हा कौशल्यविकास रोजगार व उद्योजकतातर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या रोजगार मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे प्रमुख प्रा. शशिकांत गेडाम होते. उद्घाटन जिल्हा कौशल्यविकास अधिकारी योगेंद्र शेंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी योगेंद्र शेंडे यांनी रोजगाराच्या विविध संधी कशा प्राप्त करता येऊ शकतात, याविषयी मार्गदर्शन केले. उद्घाटनानंतर विविध कंपन्यांतील पदाधिकाऱ्यांनी रोजगारविषयक माहिती दिली. त्यात प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे अनिल दुधपचारे, गणेश भुते, कॅप्टॉनचे ज्ञानेश्वर बिट्टेवार, नवभारत फर्टिलायझर नागपूर येथील मनोज रहांगडाले यांचा समावेश होता. याप्रसंगी प्रा. शशिकांत गेडाम यांनी केवळ शासकीय नोकरीवर अवलंबून न राहता आपल्या कौशल्याच्या आधारे रोजगार प्राप्त करावा, असे आवाहन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोज ठवरे यांनी केले. संचालन प्रा. पराग मेश्राम यांनी केले, आभार डॉ. विजय गोरडे यांनी मानले.



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जिल्हा कौशल्यविकास अधिकारी योगेंद्र शेंडे व मंचावर उपस्थित मान्यवर.

Hitavada

3-1-18

## Mahatma Gandhi College, Armori




A glimpse during the Placement camp.

PLACEMENT camp was held at Mahatma Gandhi Arts, Science and Late N P Commerce College, Armori. It was organised under the guidance of Lalsingh Khalsa, Principal. Shashikant Gedam, Head of Placement Department, explained the need and thought process behind the organisation of the camp. SIS Regional Training Centre, Goa officers named Jagannath Kharat, Gyaneshwar Bitturwar, Management Private Limited, Hyderabad, Madhav Shende, Secretary of District Skill Development and Employment Generation Guidance Centre, were present on the occasion. All the guests guided the students. Around 51 students of various branches of the Colleges participated in the camp. Priyadarshan Ganvir, Dr Manoj Thawre, Parag Meshram, Dr Vijay Gorde, Prof Dilip Ghonmode, Prashant Dadmal, Kishor Kuthe worked hard for the success of the programme.

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G. Arts, Science &
Late N.P. Commerce College
ARMORI, Distt. Gadchiroli

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. नसरुद्दीनभाई पंजवानी

वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली

# रोजगार व स्वयंरोजगार विभाग

## वार्षिक अहवाल

सत्र २०१६–१७

प्रस्तावना :–

स्पर्धा परीक्षेत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पण बऱ्याचशा विद्यार्थ्यांची याबाबतची मानसिकता विचार करायला लावणारी आहे. काम करायचे, पण कसे करायचे? एम.पी.एस.सी. ची तयारी करावी किंवा फक्त पैसा मिळविण्याच्या आकर्षणाने व्यवसायाकडे वळायचे, अभ्यास कसा करायचा, कोणत्या क्षेत्राची निवड करायची असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनात गोंधळ निर्माण करीत असतात.

हाच उद्देश लक्षात घेऊन आमच्या महाविद्यालयात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केन्द्र स्थापन करण्यात आलेले आहे. या मार्गदर्शन केन्द्राच्या वतीने वर्षभर एम.पी.एस.सी, यू.पी.एस.सी., बँकिंग, रेल्वे, नेट, सेट इत्यादी स्पर्धापरीक्षांविषयी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे तसेच या परीक्षांचे प्रश्नपत्रिकांचे स्वरूप माहिती करून घेण्याकरिता स्पर्धापरीक्षांचे आयोजन करणे इत्यादी कार्यक्रम या विभागाच्या वतीने राबविण्यात येतात.

- **रोजगार व स्वयंरोजगार विभाग** :–

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्लेसमेंट सेल' सत्र २०१६–१७ पासून सुरू करण्यात आली. ती समिती पुढीलप्रमाणे.

१. प्रा. शशिकांत गेडाम – समन्वयक
२. प्रा. पराग मेश्राम – सदस्य
३. प्रा. डॉ. विजय गोरडे – सदस्य
४. प्रा. मनोज ठवरे – सदस्य
५. प्रा. प्रियदर्शन गणवीर – सदस्य

समितीने सत्र २०१६–१७ करिता कार्यभार स्वीकारून प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०५/०७/२०१६ ला सभा घेण्यात आली. यात वार्षिक नियोजन करून महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेण्याचे ठरले.

**विभागाच्या वतीने आयोजित विविध उपक्रम**

- **नेट कोचिंग क्लासेस** :–

प्राध्यापक हे समाजाचे तसेच देशाचे निर्माते आहेत. सदर क्षेत्र सर्जनशील असून नवनिर्मितीसाठी प्रेरक आहे. या उद्देशाने महाविद्यालयीन अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नेट परीक्षेबाबत माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयातील नेट–सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या यशस्वी प्राध्यापकांकडून मार्गदर्शनाचे



M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★
Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

आयोजन करण्यात आले. या पूर्वतयारी शिकवणी वर्गासाठी ८५ विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. या वर्गाचे उद्‌घाटन दि. २१ डिसेंबर २०१६ ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी सांगितले की सध्याचे युग हे स्पर्धेचे असून या स्पर्धेत विद्यार्थ्यांना आपले स्थान व ओळख गुणवत्तेच्या बळावर निर्माण करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील रहावे. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात यशस्वी होण्याच्या दृष्टीने महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामीण व आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये नेट परीक्षेविषयी जागृती व्हावी यासाठी नेट परीक्षा पूर्वतयारी मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शशिकांत गेडाम यांनी केले, संचालन प्रा. मनोज ठवरे तर आभार प्रा. पराग मेश्राम यांनी मानले.

- **सुरक्षा जवानांची भरती :–**

